## औषधी वनस्पती उत्पादक व उद्यान तज्ञ

नाव :- श्री. चंद्रशेखर राजेश्वरराव कुलकर्णी

पत्ता :- मु. पो. डोंगरकडा ता. कळमनुरी जि. हिंगोली

मो. नं :- ९४२२५७६५९४

एकुण क्षेत्र :- २७ एकर, ओलीताखालील २० एकर, कोरडवाहू ७ एकर

## उल्लेखनीय कार्य

श्री. कुलकर्णी यांच्याकडे ओलीताखालील क्षेत्र जास्त असल्यामुळे त्यांनी शतावरी २ एकर, मोसंबी ३ एकर, संत्रा २ एकर, डाळींब ४ एकर, अंजीर २.५ एकर, सिताफळ २.५ ण्कर, केळी २ एकर, हळद २ एकर तसेच खरीपात कापुस १ ते २ एकर वर लागवड करण्यात आलेली आहे. त्यांच्याकडे ठिबक व तुषार सिंचनाच्या सोयी उपलब्ध आहेत. सध्या त्यांच्याकडे १५ म्हशी असून वार्षिक दुग्ध उत्पादन ५००० लीटर आहे. पशुधनापासून २५ ट्रॉली शेणखत मिळते. कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर व कृषि विभाग हिंगोली यांच्या सहकार्यातून सन २००६ मध्ये रोपवाटीका स्थापन करण्यात आलेली आहे. रोपवाटिक्ा बांबू आधारित असून ७५x१५० स्क्वे. फुटावर उभारण्यात आलेली आहे. त्याकरिता ७५% शेडनेटचा वापर करण्यात आलेला आहे. सन २००७-०८ मध्ये केळीची उती संवर्धित रोपे अंजीर, डाळींब, सिताफळ, साधारणत: हा ७०००० रोपांची निर्मीती करुन विक्री करण्यात आलेली आहे. रोपवाटिकेतूनच त्यांना जवळपास ७,३०,००० /- उत्पन्न प्राप्त झालेले आहे. शेतीमध्ये पेरणी यंत्र ट्रॅक्टर्स, कॉटन पूलर ट्रॅक्टर, चलित नांगर आदि आधुनिक यंत्रसामग्रीचा कार्यक्षमपणे वापर करतात. शतवारीपासून एकरी ३० क्विंटल उत्पादन काढून साधारणपणे त्यांनी ५,२५,०००/- उत्पन्न मिळवलेले आहे.

वार्षिक उत्पन्न - जवळपास २० लाख रु.

## शेती उद्यान तज्ञ

नाव :- श्री. मुकुंदराव नारायणराव पतंगे

पत्ता :- मु. कवडी पो. शेवाळा ता. कळमनुरी जि. हिंगोली

मो. नं :- ९४२०६६९०३४

एकुण क्षेत्र :- २७ एकर, ओलीताखालील २७ एकर

## उल्लेखनीय कार्य

सर्व जमीन ओलीताखाली येत असल्यामुळे त्यांनी फळबाग लागवडीकडे लक्ष दिले. त्यांच्या शेतात आंबा ६ एकर, पेरु ३ एकर, चिकु ३ एकर, पपई ४ एकर, मिरची ३ एकर, उस २ एकर, फुलकोबी १ एकर तसेच कांदा १ एकर ही पिके आहेत. ठिबक सिंचनावर आंबा ६ एकर, पेरु ३ एकर, चिकु ३ एकर, पपई ४ एकर, मिरची ३ एकर तसेच तुषार सिंचनाखाली गहु ३ एकर व फुलकोबी १ एकर आहे. कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर व कृषि विभाग हिंगोली यांच्य सहकार्यातून गांडूळ खत उत्पादन सुरु केल. या युनिटमधून १२००० किलो गांडूळ खत प्रतिवर्षी उत्पादन करुन त्यातुनही उत्पन्न मिळविले. गांडूळ खताच्या वापरामुळे रासायनिक खतावरील खर्चात ५०% बचत हाते असे त्यांचे मत आहे. त्यांनी मधुमक्षीका पालन हा व्यवसाय २००८ पासून सुरु केला आहे. शीतगृहाची स्थापना त्यांनी कृषि विभाग हिंगोलीच्या साहाय्याने

२००२ मध्ये केलेली आहे. तसेच आंबा, पेरु, पपई, चिकु पिकाबाबतचे ग्रेडिंग व पॅकींगचे तंत्रज्ञान वापरले. याच कारणास्तव बाजारामध्ये त्यांना चांगला भाव मिळतो. शेतीमध्ये ते ट्रॅक्टर चलित नांगर, खत व बी पेरणी यंत्र, पावर टिलर या आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर करतात. त्यांना प्रतीवर्षी शेतीमधून जवळपास २० लाख रु. उत्पन्न प्राप्त होते.

### रोपवाटिकेतून समृध्दीकडे

नाव :- श्री. चंदनसिंग प्रतापसिंग ठाकुर

पत्ता :- मु. दांडेगाव पो. रामेश्वर तांडा ता. कळमनुरी जि. हिंगोली

मो. नं :- ९६०४१६४०२१, ९८२३१७९१४९

एकुण क्षेत्र :- ३२ एकर, ओलीताखालील ३२ एकर

### उल्लेखनीय कार्य

श्री. ठाकुर यांचे शिक्षण जरी जेमतेम असले तरी त्यांची सर्व जमीन ओलीताखाली येत असल्यामुळे त्यांचा शेती नवनवीन प्रयोग करुन नवीन तंत्रज्ञान विकसीत करण्यावर भर आहे. कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर व कृषि विभाग हिंगोली यांच्य सहकार्यातून त्यांनी ओंकार रोपवाटिका सन २००६ मध्ये सुरु केली. रोपवाटिका बांबु आधारित असून त्याकरित ७५% शेडनेटचा वापर करण्यात आलेला आहे. २००७-०८ मध्ये त्यांनी आंबा, मोसंबी, सिताफळ, आवळा कलमे आपल्या रोपवाटिकेतुन विक्री करुन जवळपास चार लाखापर्यंत उत्पन्न मिळविलेले आहे.

सध्या त्यांच्या फळबागेत मोसंबी ५ एकर, संत्रा ३ एकर, आवळा ५ एकर, सिताफळ ५ एकर, आंबा ८ एकर तसेच हळद २ एकर ची लागवड करण्यात आलेली आहे. कृषि विज्ञान केंद्र, तोंडापूर यांच्या सहकार्यातून सन २००३ मध्ये गांडूळ खत उत्पादन सुरु केलेले आहे. या युनिटमधुन ४००० किलो गांडुळखत प्रतिवर्षी उत्पादन करुन वार्षिक नफा रु. १२०००/- मिळतो.

सन २००८ मध्ये चंदनसिंग यांनी शेती आधारित पुरक उद्योग म्हणून दुग्ध व्यवसाय सुरु केला. सध्या ६ म्हशी व १०० गायींचे संगोपन केल्या जाते. वार्षिक दुग्ध उत्पादन १४६०० लीटर आहे. तसेच या युनिटमधून ५० ते ६० ट्रॉली शेणखत रु ९०,०००/- वर्षाला मिळते. उपलब्ध गायींच्या गोऱ्यांच्या विक्रीतून वर्षाकाठी ५० ते ६० हजार रु कमाई होते. फळबागेतुन तसेच इतर पिकातून जवळपास २५ लाख रु उत्पन्न मिळते.

### टोमॅटोचे विक्रमी उत्पादन

नाव :- श्री. गोरख गजानन हाडोळे

पत्ता :- मु. भोसी पो. कुर्तडी ता. कळमनुरी जि. हिंगोली

मो. नं :- ९४२१४८९६९४

एकुण क्षेत्र :- ३५ एकर, ओलीताखालील ४ एकर , कोरडवाहू ३१ ए

### उल्लेखनीय कार्य

ओलिताखालील क्षेत्र जरी मर्यादित असले तरी ओलीताखाली टोमॅटो ८१.५ एकर, मिरची १.५ एकर, गोबी १ एकर या भाजीपाल्याची लागवड करुन त्यात टोमॅटोचे विक्रमी उत्पन्न त्यांनी घेतलेले आहे. याशिवाय कोरडवाहू क्षेत्रावर त्यांनी कापूस १० एकर, खरीप ज्वार ४ एकर, मका २ एकर, सिताफळ १ एकर, चिंच १ एकर, हरभरा १ एकर, सोयाबीन २ एकरची लागवड केलेली आहे. ठिबक व तुषार सिंचनाची सोय त्यांनी केलेली आहे. ठिबक खाली टोमॅटो व मिरची व तुषार खाली हरभरा, सोयाबीन, गोबी घेतलेली आहे. टोमॅटोचे उत्पन्न एकरी ३२० क्विंटल काढलेले आहे. त्यांनी शेतात गांडूळ खत प्रकल्प सुरु केलेला आहे. तसेच निंबोळी पावडर उत्पादन हा प्रकल्प सन २००० साली सुरु करुन वार्षिक २० क्विंटल निंबोळी पावडर उत्पादन केले असून त्याची विक्री रु.१०/- प्रति किलो या प्रमाणे करण्यात येत आहे. त्यांच्याकडे १ ट्रॅक्टर, खत व बियाणे पेरणीयंत्र, ट्रॅक्टर चलित नांगर, कॉटन पूलर, खत फेकणी यंत्र इ. आधुनिक यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने मशागतीची व शेतीची कामे करण्यात येतात. टोमॅटो पासूनच त्यांना रु.४,३२,५००/- उत्पन्न मिळालेले आहे. वार्षिक उत्पन्न जवळपास ८,७३,०००/- शेतीतुन मिळालेले आहे.

**हळद उत्पादक**

नाव :- श्री. माधव सखाराम अंबेकर

पत्ता :- मु. पो.चोंढी (आंबा) ता. वसमत जि. हिंगोली

मो. नं :- ८८१९३१४५१

एकुण क्षेत्र :- ०५ एकर, ओलीताखालील ०५ एकर

**उल्लेखनीय कार्य**

शेतीचे क्षेत्र मर्यादित असले तरी सर्व जमिन ओलीताखाली आहे. त्यांच्याकडे सेंद्रीय हळद (१.५ एकर) या बरोबरच दरवर्षी सोयाबीन, ज्वारी खरीप हंगामात घेतात तसेच त्यांच्याकडे ठिबक व तुषार सिंचनाच्या सोयी उपलब्ध आहे. ठिबक सिंचनाखाली आवळा २.५ एकर व तुषार सिंचनाखाली सोयाबीन व हळद आहे. त्यांना सोयाबीनचे उत्पन्न १३ क्विंटल प्रति एकर या प्रमाणे काढलेले आहे. त्यांनी हळदीची लागवड सेंद्रीय पध्दतीने केलेली आहे. हळदीचे त्यांनी एकर २१ क्विंटल उत्पादन काढले. दुग्धव्यवसाय हा कृषि आधारित पुरक उद्योग ते करतात. NDDB दुध संकलन केंद्रावर त्यांनी मागील वर्षी ५४३९ लिटर दुध विक्री केले असून त्यापासून त्यांना १००८५९.०० इतके उत्पन्न मिळाले. त्याच्याकडे मुऱ्हा जातीच्या म्हशी आहेत. त्यांचे वार्षिक उत्पन्न सर्वसाधारणपणे ५.०० लाख आहे. शेतीमध्ये सर्व कामे ट्रॅक्टरच्या साहाय्याने करतात. त्यांना सेंद्रिय पध्दतीने हळद लागवड केल्याबाबत महाराष्ट्र शासनाचा २००६-०७ या वर्षी वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार म.शा. २००६ प्राप्त झाला.

**गावंडे यांचे नावीन्यपूर्ण अंजीराचे उत्पादन**

नाव :- श्री. बेगाजी संभाजी गावंडे

पत्ता :- मु. पो. डोंगरकडा ता. कळमनूरी जि. हिंगोली

मो. नं :- ९४२२८७६४८९

एकुण क्षेत्र :- ८० एकर, ओलीताखालील ६६ एकर

**उल्लेखनीय कार्य**

श्री गावंडे यांची मध्यम ते हलकी जमिन शिक्षण जेमतेम पण ध्येय, चिकाटी यातून त्यांनी शेतीत नवनवीन प्रयोग करुन शेतीचे तंत्रज्ञान आत्मसात केले. सध्या त्यांच्याकडे ४८ एकर वर ठिबक सिंचनाची सोय आहे. त्यांच्या शेतात प्रामुख्याने केळी व अंजीराची फळबाग आहे. साधारणत: ६६ एकरावर फळबाग आहे. सध्या शेतात केळी १८ एकर, अंजी ६ एकर, सिंताफळ ८ एकर, आंबा ८ एकर, पपई ८ एकर, ऊस ६ एकर तसेच दरवर्षी खरीपात कापूस १२-१३ एकर, सोयाबीन तसेच रबी हंगामात ज्वार परभणी मोती हे घेतात. केळीचे उत्पादन ७६२ क्विंटल तसेच अंजीराचे ९६.८ क्विंटल व शाबुकंदाचे ५० क्विंटल प्रति एकर मिळालेले आहे. त्यांच्याकडे दोन ट्रॅक्टर्स व एक पावर टिलर आहे. एकूण क्षेत्रापैकी ठिबक सिंचनाद्वारे केळी १८ एकर, अंजीर ०६ एकर, सिताफळ ०८ एकर, आंबा ०८ एकर तसेच पपई (तैवान) ०८ एकर लागवड करण्यात आलेली आहे. आतापर्यंतच्या उत्पादन उच्चांकात केळीचे हेक्टरी उत्पन्न रु.८,५०,०००/- तसेच अंजीराचे रु.९,६८,०००/- मिळालेले आहे. संपूर्ण पपई उत्पादन सेंद्रीय पध्दतीने घेतलेले आहे.